**Indian Streams Research Journal**
**Vol -1 , ISSUE –1, Feb - 2011**
**ISSN:-** 2230-7850 Available online at www.isrj.org

# सन २००५ चा कौटोंबिक हिंसाचार विरोध कायदा व सद्यस्थिती

**प्रा. शोभा विष्णुपंत खंदारे**

अर्थशास्त्र विभाग , विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभुर्णी.

## Abstract

२००५ च्या कौंटोबिक हिंसा कायद्यानुसार एखाद्या महिलेला बालकाला आरोग्य व सुरक्षित जीवनाला धोका निर्माण होणे, आर्थिक नुकसान होणे, स्त्रियां आणि बालकांना वेदना देणे, त्यांना सतत आपमाणीत करणे, शारीरिक, आर्थिक, भावनिक, लैंगिक घटकांच्या संदर्भात धमकी देणे इत्यादी घटना घरगुती हिंसाचारात येतात. याला प्रतिबंध घालण्यासाठी खालील २००५ कायदा करण्यात आला असला तरी स्त्रीयांचे अज्ञान, निरक्षरता, सामाजिक बंधने इत्यादीमुळे कायदयाचा वापर अत्यंत कमी होतो.

## Key Word

1) अत्याचार हिंसा – मारणे, हाणने, भावनिक / मानसीक त्रास देणे.

2) हुंडा – लग्नाच्यावेळी वधुपित्याने वर पित्याला पैशाच्या स्वरूपात / मौल्यवान वस्तु देणे, Honor Killing , मानहाणी, पितृसत्ताक – पुरूष कुटूंबप्रमुख

**प्रस्तावना :**

भारतीय समाजव्यवस्थेचा पुराणातील उल्लेख पहाता आर्यकालीन समाजव्यवस्था मातृसत्ताक होती. घरचा सर्व कारभार आणि निर्णय एक स्त्री घेत असे यायाच अर्थ त्याकाळात स्त्रीयांना सर्वप्रकारचे स्वातंत्र्य होते म्हणजेच त्या शिक्षण घेवू शकते होत्या. सन, समारंभात त्यांचा सक्रीय सहभाग असे. थोडक्यात त्यांना आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्वातंत्र्य असल्याने संपूर्ण कुटूंबावर त्यांचे वर्चस्व असे. त्याच्या पुढच्याकाळात गार्गी, मैत्रिय यासारख्या विदुषी स्त्रियांनी आपल्या ज्ञानाने अनेक विद्वान पुरुषांना हरवले. पुराणाचा संदर्भ पहाता अनेक स्त्रियांना शिक्षणाबरोबरच युध्द प्रशिक्षण दिले जात असे. थोडक्यात त्याकाळात स्त्री स्वातंत्र्याचा स्विकार केला गेला. त्याला सामाजिक मान्यता होती.

पुढे सामाजिक स्थिती बदलल्याणे स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने आली. त्यावेळची सामाजिक स्थिती अशी होती की, सतत युध्द व संघर्ष होत असल्याने किंवा छोटी छोटी राज्य अस्तित्वात असल्याने, त्यांच्यात सतत संघर्ष होत असे अर्थातच तरुण सैनिक मरण पावले. त्यांच्या विधवांचा प्रश्न निर्माण झाला. त्यातून अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होवू लागले. समाजामध्ये अधिकाअधिक विधवा आसल्याने त्यांच्यावर सामाजिक नियंत्रण ठेवण्यात (घालण्यात) आले. मनुस्मृतीच्या काळात स्त्रीची आवस्था अधिकच वाईट झाली. शिक्षण, सन समारंभ, धार्मिक कार्ये यापासून तीला वंचित ठेवण्यात आले. पती निधनानंतर केशवपण, पांढरी वस्त्र परीधान करणे, बांगडया काढणे असे रुप स्त्रिला देण्यात आले. थोडक्यात तिला विद्रूप केले. तिच्यावर घरातीलच व्यक्ती बलात्कार करत असे, अत्याचारातून जन्माला येणाऱ्या बालकांना समाजमान्यता नसल्याने त्यांना रस्त्यावर सोडले जाई. थोडक्यात त्याकाळात स्त्रियांवर अनेक बंधने घालून ही पुरुषप्रधान समाज व्यवस्थेकडून त्यांच्यावर अनेक अत्याचार होत असत. यातूनच सतीपध्दती आस्तित्वात आली. बंधने अधिक घट झाली.

समाजसुधारकांनी स्त्रियांच्या अन्यायाविरुध्द आवाज उठवला. सतीसारखी चाल बंद केली. विधवा विवाहाला मान्यता दिली. तरी ही स्त्रियांच्या बाबतीत त्यांची मानसिकता बदलली नाही. त्यांच्यावरील बंधने शिथील झाली आसली तरी तीला उपभोग्य वस्तु समजणाऱ्या पुरुष तिच्यावर अत्याचार करत राहीला. आधुनिक काळात ही अत्याचाराचे स्वरुप बदलले असले तरी त्याचे प्रमाण कमी झाले नाही. म्हणून शासनाला २००५ मध्ये (Domestic Violence Act) "घरेलू हिंसाचा प्रतिबंधक कायदा" करावा लागला. या कायद्यात घरगुती / अत्याचार म्हणजे काय? याची सविस्तर मांडणी केली आहे. शिवाय 'राष्ट्रीय कुटूंब आणि आरोग्य पहाणी ' च्या अहवालानुसार देशात होणारे अत्याचार आणि आरोग्य याबाबत वास्तव चित्र नजरेस आणून दिले आहे.

एका पाहणीनुसार भारतात स्त्रियांवरील अत्याचार कुटूंबातील व्यक्तीकडून किंवा जवळच्या नातेवाईकांकडून होतो. राष्ट्रीय पातळीवरील कुटूंब घरगुती अत्याचाराचे प्रमाण ३३.५ टक्के असून लैंगिक अत्याचाराचे प्रमाण ८.५ टक्के आहे. शिवाय धर्माचा विचार करता बौध्द आणि जैन स्त्रियामध्ये हे प्रमाण सर्वांत कमी आहे. तर मुस्लीम स्त्रीयांमध्ये हे प्रमाण सर्वाधिक आहे. एका रिपोर्टप्रमाणे जागतिक एकूण लैंगिक अत्याचारापैकी सर्वांत कमो अत्याचार भारतीय स्त्रियांवर होतात. भारत हा अतिरिक्त लोकसंख्येचा देश असून ही अत्याचाराचा दर १,००,००० स्त्रियांमागे **४६** ऐवढा आहे. बलत्काराचा दर १,००,००० मागे २ असुन हुंडयासाठी केल्याजाणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण (सासरच्या लोकांकडून) दर लाखामागे ५.९ : आहे. अनैतिक संबंधातुन होणाऱ्या आत्याचाराचे प्रमाण अत्यंत कमी असून जागतिक पातळीवर हे प्रमाण १,००,००० स्त्रियांमागे ६.२ : आहे. युनाटेड स्टेट मध्ये हे प्रमाण ५९० एवढे आहे. अहवालानुसार युनायटेड स्टेटमध्ये गुन्हेगारीचे व बलत्काराचे प्रमाण अधिक आहे.

कौटोंबिक हिंसाचार जगाच्या पाठीवर सर्व ठिकाणी चालतो. या अत्याचारात शिवीगाळ करताना, शारीरिक आणि लैंगिक शब्दांचा वापर केला जातो. सन १९९९ च्या अभ्यासानुसार भारतातील पाच जिल्हयात सन १९९५-९६ मध्ये षिवीगाळ व मानहणीने बोलणे हे प्रमाण १८ ते ४५ टक्के होते.

**व्याख्या :**

1) घरगुती हिंसाचारात शारीरिक इजा, मानसिक छळ किंवा तीच्या जिवीतास धोका या सर्वांचा समावेश होतो. शारीरिक अत्याचार, लैंगिकछळ, षाब्दिक व भावनिक छळ आणि अर्थिक पिळवणूक इत्यादी.
2) हुंडयासाठी अथवा इतर संपत्तीसाठी किंवा मौल्यवान वस्तुंसाठी तिचा शारीरिक इजा करणे किंवा मानसिक छळ करणे.
3) वर उल्लेखलेल्या आणि 1 व 2 मधील अत्याचारा व्यतिरिक्त तिला तिच्याशी संबंधीत व्यक्तीला धमकावणे.
4) तिच्या शारीरिक किंवा मानसीक छळ करणे.

**अभ्यासाची उदीष्टे :**

1) घरगुती हिंसाप्रकाराचा अभ्यास करणे.
2) 2005 च्या घरगुती हिंसाचार विरोधी कायदयाच्या तरतुदी अभ्यासणे.
3)घरगुती हिंसाचाराचा अभ्यास करणे.

**संशोधनपध्दती :**

प्रस्तुत शोध निबंध लिहीण्यासाठी दुय्यम साधणाचा वापर केला आहे. त्यामध्ये संदर्भग्रंथ, मासिके, शासकीय अहवाल, संकेतस्थळे इत्यादी द्वारा माहिती गोळा करण्यात आली आहे. वरील उदिष्टानुसार त्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

२००५ च्या राष्ट्रीय कुटूंब आरोग्य पहाणी अहवालानुसार एखाद्या महिलेला बालकाला आरोग्याला व सुरक्षित जीवनाला धोका निर्माण होणे, आर्थिक नुकसान होणे, स्त्रिया आणि बालकांना वेदना देणे, त्यांना सतत आपमानीत करणे, तिला शारीरिक, भावनात्मक, लैगिंक, आर्थिक घटकांच्या इत्यादी घटना घरगुती हिंसाचारात येतात.

कौंटुंबिक हिंसाचारात विवाहित, अविवाहित शिवाय इतर नातेवाईकां समवेत राहणाऱ्या, विवाहित, अविवाहित, विधवा, आई, बहिण, मुलगी, सून, लग्नाषिवाय एकत्र राहाणारी, विवाह न करणारी महिला यांचा समावेष या कायद्यात होतो.

सन २००६ च्या राष्ट्रीय आरोग्य पहाणीनुसार १५ ते ४९ वयातील स्त्रियांवर लैंगिक अत्याचार केले जातात. त्यातील महत्वाचा भाग म्हणजे स्त्रीच्या वैवाहिक जीवनात तिच्या नवऱ्याकडून लैगिंक अत्याचार होतात. जसे की बळजबरीने किंवा तिच्या इच्छेशिवाय लैगिंक संबंध ठेवणे किंवा लैंगिककृत्य करायला लावणे. या पहाणीनुसार १५ ते ४९ वयातील विवाहित स्त्रियांच्या अनुभवावरुन ८.५ टक्के स्त्रिया संपूर्ण जीवनात लैंगिक अत्याचाराला बळी पडल्या आहेत. वैवाहिक जीवनात लैंगिक कृत्य केले तर त्याला भारतीय कायद्यात त्याला बलात्कार समजला जात नाही.

या अहवालानुसार सर्वांत कमी लैंगिक अत्याचार १५ ते ४९ वयातील स्त्रियांवर होतो. शहरी स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण ६ टक्के असून ग्रामीण अत्याचाराचे प्रमाण १० टक्के आहे.

धर्मानुसार विचार करता बौध्द व जैन स्त्रियांच्या जीवनात लैंगिक हिंसाचाराचे प्रमाण सर्वांत कमी असून ते ३ ते ४ टक्के आहे. शिख स्त्रियांचे हे प्रमाण ५ टक्के तर खिश्चन स्त्रियांचे प्रमाण ६ टक्के आहे. हिंन्दुस्त्रियांमध्ये हे प्रमाण ८ टक्के आहे. सर्वांत जास्त दर मुस्लिम स्त्रियांचा ११ टक्के आहे.

२००५ च्या कायद्यानंतर भारतात पोलीसात दाखल झालेले घरगुती अत्याचाराचे खटल्याची त्याची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | राज्य | २०१० | २०११ | २०१२ |
|---|---|---|---|---|
| १) | आसाम | ०१ | ० | ० |
| २) | त्रिपुरा | ०१ | ० | ० |
| ३) | पंजाब | १९ | ० | ० |
| ४) | सिक्कीम | ३ | ३ | ० |
| ५) | मिजोरम | ३ | ० | ० |
| ६) | कर्नाटक | १ | ० | ४ |
| ७) | गोवा | १ | १ | ० |
| ८) | नागालॅन्ड | ६ | २९ | ८ |
| ९) | हिमाचलप्रदेष | १२ | १८ | ० |
| १०) | अंदमान निकोबार | २८ | १९ | ० |
| ११) | मणिपूर | १८ | ३९ | ० |
| १२) | राजस्थान | ४५ | ३९ | ३६ |
| १३) | केरळ | ४४ | ९६ | ११७ |

वरील तक्त्यावरुन असे म्हणता येईल की आसाम, त्रिपुरा, गोवा, मिझोरम, सिक्कीम या राज्यात या कायद्यातंर्गत पोलीसस्टेषनला F.R.I दाखल झाले त्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. याचाच अर्थ या राज्यातील शारीरिक, मानसिक, आर्थिक व भावनिक आत्याचाराला वाचा फुटली नाही. यावरुन घरगुती अत्याचार बाहेर बोलले जात नाहीत. दुसरा निष्कर्ष म्हणजे त्या कुटुंबाच्या किंवा इतरांच्या दबावा खाली पोलीसात तक्रार देत नाहीत. राजस्थान, अंदमान, निकोबार, मणिपूर, हिमाचलप्रदेश, नागालॅन्ड या राज्यात पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाल्याचे प्रमाण सार्वाधिक आहे.

सन 2006 साली असणाऱ्या महिला व बालविकास मंत्री रेणुका चौधरीच्या मतानुसार 70 टक्के स्त्रिया घरगुती अत्याचाराला बळी पडतात. हुंडाबळीच्या केसेसमध्ये ती हुंडयासाठी मेली असे सांगितले जात नाही. शिवाय हुंडाबळीची केस दाखल झाली तरी माघारी घेतली जाते किंवा तडजोडी केल्या जातात.

## घरगुती हिंसेचे प्रकार

### 1) शारीरिक अत्याचार

शारीरिक अत्याचारामध्ये तिच्या नवऱ्याने किंवा कुटुंबातील इतर पुरुष/ महिला सदस्यांनी तिला चापटामारणे, ढकलने, लाथमारणे, धक्का देणे, धडकने, चावणे, अकुंजीदार वस्तू षरीरात घुसवणे, फेकुण मारणे, गळा आवळून मारणे, जिवेमारण्याची धमकी देणे, मारझोड करणे, शस्त्राने / हत्याराने जीवेमारण्याची धमकी देणे, इत्यादी प्रकार येतात. हे सर्व प्रकार जागतिक पातळीवर घडून येतात. मात्र भारतापेक्षा जागतिक पातळीवर हे प्रमाण अधिक आहे.

### 2) भावनिक अत्याचार

घरगुती अत्याचारात शारीरिक अत्याचारा इतकेच भावनिक अत्याचाराला ही तेवढीच मान्यता मिळाली आहे. किंबहूना त्याला अधिक महत्व दिले जाते. शारीरिक व भावनिक अत्याचार मानवी हक्काच्या विरुध्द आहे. भारतासारख्या विकसनशील देशात तिच्या आत्मसन्मानाला ठेच पोहचेल असे वागणे किंवा बोलणे, तिला सतत कमी लेखने, तिचा छळ करणे, शिव्या देणे, तिला हिन नावाने हाक मारणे, तिला कोणताही कौटुंबिक व सामाजिक वाईट स्थितीबद्दल दोष देणे. यासारखा भावनिक त्रास दिला जातो. ज्या स्त्रियांचा भावनिक छळ झाला आहे. अशा स्त्रियांची भावनिक कोंडी होते. भावनिक संघर्षामध्ये त्या आत्महतेस प्रवृत्त होतात. आत्महतेचा प्रयत्न करतात किंवा आत्महत्या करतात. National Center For Biotechnology Information च्या अभ्यासावरुन असे म्हणता येईल की भारतात स्त्रियांवर भावनिक, शारीरिक व मानसिक अत्याचार हे जवळच्या नातेवाईकाकडून किंवा नवऱ्याकडून होतो. या अहवालावरुन असे म्हणता येईल की ७.५ टक्के स्त्रिया भावनिक अत्याचाराला कंटाळून आत्महत्या करतात. भारतातील घरगुती हिंसा ही विभागीय, वैयक्तिक, सामाजिक व आर्थिक व इतर अनेक घटकांवर अवलंबून आहे.

### 3) लैंगिक अत्याचार

घरगुती हिंसाचारत लैंगिक अत्याचार येतो. लैंगिक अत्याचारानुसार लैंगिक किंवा आपत्य निर्मितीसाठी सक्ती / बळजबरी करणे, विवाहित असून स्वतःच्या पत्नीवर लैंगिक अत्याचार करणे तिच्या मनाविरुध्द लैंगिक संबंध ठेवणे. हा बलात्कार

**ISSN:-** 2230-7850 Available online at www.isrj.org

ठरतो. भारतात IPC कलम ३७५ प्रमाणे पत्नीचे वय १५ वर्षाच्या आत असेल तर तिच्या वर लैंगिक संबंधाची बळजबरी केल्यास तो बलात्कार ठरतो. मात्र १५ वर्षापेक्षा जास्त वय असल्यास तो बलात्कार ठरत नाही.

**4) मानहानी / प्रतिष्ठेची हानी**

तिला आपल्या प्रतिष्ठेला बाधा आनणारी व्यक्ती म्हणून त्याने किंवा कुटूंबातील इतर सदस्याने तिला हिन समजणे, तिच्या प्रतिष्ठेला बाधा अणणाऱ्या बाबी म्हणजे विवाहानंतर विवाहबाह्य संबंध ठेवणे, कुटुंबाला अमान्य असणारे नातेसंबंध ठेवणे, घटस्फोटाची कारवाई करणे, समलिंगी संबंध असणे इत्यादी.

**5) हुंडाबळी**

नवविवाहितेने हुंडा आणला नाही / कमी आणला म्हणून तिला शारीरिक व मानसिक त्रास देणे / छळ करणे. हुंडयासाठी ती स्वताः गळफास घेवून, स्वताः विष घेवून, पेटवून घेवून आत्महत्या करतात किंवा आत्महत्या करण्यास कुटुंबीय किंवा नवरा प्रवृत्त करतो.

**6) पितृसत्ताक समाजपध्दती**

भारतात पितृसत्ताक कुटुंबपध्दती आस्तित्वात असून स्त्री – पुरूष असा भेद केला जातो. परिणामी समाजातील आधिकाधिक संधी पुरूषांना प्राप्त होतात. स्त्रियांच्या क्षमता आणि कर्तृवावर निर्बंध लादले जातात. शिवाय आपत्य निर्मीतोच्या निर्णयामध्ये स्त्रीयांचा सहभाग नगण्य मानला जातो. आपत्य निर्मीतीतीची जबाबदारी तिच्यावर असली तरी निर्णय मात्र दुसरा घेतो. थोडक्यात हाही भावनीक अत्याचार होय.

थोडक्यात वरील विवेचनावरून खालील निष्कर्ष काढता येतील.

१) भारतात शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने या कायद्याबद्दल त्यांना फारषी माहिती नाही.
२) सासरच्या दबावाखाली व माहेरचा पाठिंबा नसल्याने महिला घरगुती अत्याचाराबाबत तक्रार करत नाहीत.
३) १९६१ चा हुंडाबंदी कायदा होवून ही सामाजिक प्रतिष्ठेसाठी कायदा झुगारून हुंडा दिला व घेतला जातो. त्यासाठी हुंडाबंदी कायद्याबाबत जागृती निर्माण करावी.
४) तक्रार कोणाकडे करावयाची हे माहित नसल्याने आणि तक्रार केली तर सासरचे लोक आपल्याला सांभाळणार नाहीत अशी भिती वाटते म्हणून तक्रर केली जात नाही.
५) भारतीय स्त्री आर्थिक आणि शैक्षणीक दृष्टया कमकुवत असून त्यामुळे त्यांना कायद्याची माहिती नसते म्हणून त्या अत्याचार सहण करतात.

वरील संशोधना वरून असे म्हणता येईल की, भारतीय स्त्रीचे दुय्यम स्थान, आज्ञान, निरक्षरता, रूढी व परंपरा व आर्थिक दुर्बलता यामुळे ती अत्याचाराला बळी पडते. सन २००५ कायदा लागू होवून ही म्हणावा तसा स्त्रियां वरील अत्याचार व अन्याय कमी झालेला नाही. समाजात वावरतांना त्यांना कमी लेखले जाते. त्यांच्यावर शारीरिक, मानसिक, भावनिक अत्याचार केले जातात. या सर्व परिस्थितीचा परिणाम स्त्रीयांच्या भावनिक विश्वावर व मानसिकतेवर होतो. उदा : वावरताना दबून वावरणे, आत्मविश्वास कमी झालेला असणे, मानसिक आजाराचे बळी पडणे असे अनेक वाईट परिणाम तिच्या व्यक्तीमत्वावर होतो. म्हणुनच या कायद्याची कडक आंमलबजावणी झाली पाहिजे.

**संदर्भ :**

1) Wifikipidia 2005 चा घरगुती हिंसाचार कायदा.
2) २००६ चा कौंटोबिक आरोग्य पहाणी अहवाल.
3) इतर पहाणी अहवाल
4) Internet